दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com


**आजचा सुविचार**

आयुष्यात कुठल्याही परीस्थितीत
सुखी राहण्याचा प्रयत्न करा,
दु:खी राहिल्याने
उद्याचे प्रॉब्लेम सुटणार नाहीयेत उलट
आजचे सुख सुद्धा निघून जाईल...



बिबट्याच्या वारंवार दर्शनाने नागरिकांची हवा टाईट... पान ३


वर्ष : ०५ | अंक : ९३, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, रविवार, दि.१६ नोव्हेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# बापरे! पुण्यात तब्बल १५०० ते २००० कोटींचा नवा जमीन घोटाळा?

## साडेचार कोटींचा मुद्रांक शुल्क चोरी केल्याचा आरोप

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, पुणे :** पुण्यात आता नवीन कथित जमीन घोटाळ्याची सध्या चर्चा होत आहे. हडपसर परिसरातील शेकडो एकर शेतजमिनींच्या संदर्भात तब्बल २००४ पासून सुरू असलेल्या कथित गैरव्यवहारांवर आता मोठं प्रकरण उभं राहिलं आहे.

क्रांती शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष अमोल यशवंत तुपे यांनी थेट मुख्यमंत्री आणि महसूल मंत्र्यांकडे गंभीर तक्रार अर्ज दाखल केला आहे. हा अर्ज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांना सादर करण्यात आला आहे. त्याचबरोबर जिल्हाधिकारी पुणे, विभागीय आयुक्त पुणे, संचालक नगररचना, आयुक्त पुणे महापालिका, पीएमआरडीए, नोंदणी व मुद्रांक अधिकारी यांना देखील प्रत पाठवण्यात आली आहे.

अर्जात थेट सिटी कॉर्पोरेशन लिमिटेड, पुणे आणि त्यांच्या संचालकांवर गंभीर आरोप लावण्यात आले आहेत. त्यामध्ये जे. के. भोसले (व्यवस्थापकीय संचालक), अनिरुद्ध प्रद्युम्न देशपांडे (व्यवस्थापकीय संचालक), जयंत हिरालाल शहा (डायरेक्टर) सुजय गार्डन, मुकुंदनगर, पुणे, ललितभाई चुनीलाल अदाणी (डायरेक्टर) कंबाला हिल, मुंबई, बिमल जयंत पारेख (डायरेक्टर) मालाबार हिल, मुंबई, जगदीश प्रभाकर देशपांडे (डायरेक्टर) प्रभात रोड, पुणे, सोना अनिरुद्ध देशपांडे – शिवाजीनगर, पुणे यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

### आरोप काय आहेत?

▶शेतकऱ्यांच्या जमिनी बेकायदेशीर मार्गाने गिळंकृत, इतर हक्कात सातबारामध्ये नाव असलेल्या शेतकऱ्यांची संमती न घेता बेकायदा व्यवहार केले.

▶कुळकायद्याचे उल्लंघन करून शेतकरी व कुळ यांच्या संमतीशिवाय दस्त उभारणे

▶वर्ग २, नवीन शर्तींच्या जमिनी व शासकीय जमिनी परवानगीशिवाय खरेदी करून एकत्रीकरणात समाविष्ट केल्या.

▶शासनाचा महसूल, मुद्रांक शुल्क, नजराणा यांची मोठ्या प्रमाणात चोरी केली.

▶तब्बल ₹४,४९,१६,९५०/- इतक्या रकमेचा मुद्रांक शुल्कात घोटाळा उघड

▶प्रत्यक्षात एकूण महसूल चोरीची रक्कम ₹१५०० ते ₹२००० कोटींपर्यंत असल्याचा अंदाज आहे. खोटे खरेदीखत, करारनामे, साठेखत, विकसन करारनामे आणि बनावट कुलमुखत्यारपत्र तयार केले.

▶शासनाच्या टाऊनशिप पॉलिसीनुसार जमिनी खरेदी केल्यावर सदनिका विकताना मुद्रांक लाभ घेतला. त्यामुळे कंपनीने शासनाची फसवणूक केल्याचे निदर्शनास आले आहे. असे असताना कर्ज मिळाले कसे? बांधकाममंजुरी कशा दिल्या? असा सवाल क्रांती शेतकरी संघटनेने केला आहे.



### महसूल विभागाचा अहवाल काय?

जिल्हाधिकारी पुणे यांनी मार्च २०२५ मध्ये चौकशी आदेश दिले होते. तहसीलदार हवेली, मंडल अधिकारी हडपसर व ग्रामविकास अधिकारी यांनी दिलेल्या अहवालात सिटी कॉर्पोरेशनने शेतकऱ्यांची फसवणूक केली असल्याचे स्पष्ट. काही फेरफार रद्द करण्यात आले असून संगणकीय ७/१२ उताऱ्यांमध्ये तफावत आढळली.

### शेतकऱ्यांच्या मागण्या काय?

- हडपसर अमनोरा टाऊनशिपसाठी दिलेले एकत्रीकरण तात्काळ रद्द करावे.
- लेटर ऑफ इंटेंट रद्द करावे.
- शासनाने दिलेले अतिरिक्त फायदे रद्द करून जमीन मूळ शेतकऱ्यांना परत द्यावी.
- गैरअर्जदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करून कारवाई करावी.
- महसूल चोरीची पूर्ण चौकशी करून अब्जावधी रुपयांची वसुली करावी.

### “ संघटनेची मागणी...

क्रांती शेतकरी संघटनेचे अध्यक्ष अमोल तुपे म्हणाले, शेतकऱ्यांच्या जमिनी गिळंकृत करून, महसूल चोरी करून, शासन व सर्वसामान्यांची फसवणूक करण्यात आली आहे. आम्ही या प्रकरणी सखोल चौकशी व फौजदारी कारवाईची मागणी करतो.

### “मुख्य आकडेवारी

- तक्रार दाखल : ३ जानेवारी २०२५
- महसूल चोरी : ₹४.४९ कोटी (नोंदणी शुल्क)
- एकूण अंदाजे महसूल नुकसान : ₹१५००–२००० कोटी
- फेरफार चौकशी : जिल्हाधिकारी पुणे, मार्च २०२५
- प्रभावित जमीन : हडपसर सर्व्हे नं. १३७, १३९, १४४, १७३, १८१, १८२, १८५, १८७, २०१, २४२, २४३, २४४

हडपसर येथील जमिनींबाबतचा हा घोटाळा केवळ शेतकऱ्यांचा अन्याय नाही तर शासनाच्या महसूलाला दिलेला मोठा फटका आहे. दहा हजार सदनिका विक्री झाल्याने सुमारे एक हजार कोटींचा घोटाळा झाल्याचा आरोप केला जात आहे. शेतकरी संघटनेने मागणी केली आहे की, संपूर्ण एकत्रीकरण रद्द करून इरिगेशन पाणी पट्टी न भरलेल्या सरकार नाव लागलेल्या त्या जमिनी मूळ शेतकऱ्यांना परत द्याव्यात आणि सिटी कॉर्पोरेशनवर फौजदारी कारवाई करावी.

## एचआयव्ही जनजागृतीसाठी तालुकास्तरावर प्रशिक्षण

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.१४, बुलढाणा :** जिल्ह्यात एचआयव्ही/एड्स प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी विविध विभागांमध्ये समन्वय वाढवून जनजागृती बळकट करण्यावर भर देण्यात आला आहे. तालुकास्तरावर लवकरच प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येणार असून सर्व विभागांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांनी केले.

आंतरविभागीय बैठकीत उपचारातील सातत्य, समुपदेशन आणि उपलब्ध आरोग्य सुविधांमुळे एड्समुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये घट झाल्याचे समाधान व्यक्त करण्यात आले. युवकांमध्ये जागरूकता वाढवण्यासाठी महाविद्यालयांतील Red Ribbon Club च्या माध्यमातून संवाद वाढवण्याचे निर्देश देण्यात आले.

*** एचआयव्ही एड्स प्रतिबंध व नियंत्रण कायदा २०१७**

एचआयव्ही संक्रमित व्यक्तींविरुद्ध भेदभाव करणे हे कायद्याने दंडनीय आहे. उपचारास नकार देणे, भेदभाव, कलंकित करणे अशा प्रकारांवर संबंधित संस्था/व्यक्तींवर कारवाई करण्यात येणार असल्याचे उपस्थित अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

## ट्रान्सजेंडर गँगने तरुणाचं केलं अपहरण...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, मुंबई :** मालाडमधून एक अतिशय धक्कादायक घटना समोर आली आहे. मालाडमध्ये ट्रान्सजेंडर गँगने तरुणाचं अपहरण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे मालाडमध्ये एकच खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे फक्त अपहरणाचा आरोप नाही तर ट्रान्सजेंडर गँगने या तरुणाचं अपहरण करुन त्याला सुरतला नेवून त्यांचं बळबजबरीने लिंगबदल शस्त्रक्रिया केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी मालाडच्या मालवणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पोलिसांनी कडक कारवाई केली आहे.

मालाडच्या मालवणी परिसरात ट्रान्सजेंडर नेहा खान आणि तिच्या साथीदाराने पीडित तरुणाला मारहाण केली, मग अश्लील व्हिडीओ दाखवून धमकवल्याचा आरोप पीडित तरुणाने केला आहे. या प्रकरणी मालवणी पोलिसांनी ४ जणांना अटक केली आहे. तर ३ आरोपी अद्यापही फरार असल्याची माहिती आहे. ट्रान्सजेंडर गँगने २८ ऑक्टोबरला पीडित तरुणाचं अपहरण करुन सुरत नेवून लिंगबदल शस्त्रक्रिया केल्याचा आरोप करण्यात आला आहे. पीडित मुलगा हा केवळ १९ वर्षांचा आहे. ट्रान्सजेंडर गँगने त्याला मारहाण केली. त्याचं अपहरण करत सुरतला नेलं. तिथे एका खासगी रुग्णालयात त्याच्यावर लिंगबदल शस्त्रक्रिया केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी मालवणी पोलिसांनी तातडीने कारवाई केली आहे. पण तरीही अद्याप पूर्ण आरोपी पकडण्यात आलेलं नाही.

**पीडित तरुणाला भिक्षा मागण्यासही भाग पाडल्याचा आरोप**

पीडित मुलगा हा महाविद्यालयात शिक्षण घेत आहे. त्याला ट्रान्सजेंडर गँगने पकडत मारहाण केली. त्यानंतर त्याला ब्लॅकमेल करुन थेट सुरतला जबरदस्ती नेलं. ट्रान्सजेंडर तेवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी सुरतमध्ये एका खासगी रुग्णालयात त्याच्यावर लिंगबदलाची शस्त्रक्रिया करुन घेतली. आरोपी ट्रान्सजेंडर एवढ्यावरच थांबले नाहीत तर त्यांनी पीडित तरुणाला भिक्षा मागण्यास भाग पाडलं. तसेच त्याच्याकडून पैसे उकळले. अखेर पीडित तरुणाला योग्य संधी मिळाली आणि तो त्यांच्या तावडीतून निसटला. त्याने थेट मालवणी पोलीस ठाणे गाठलं. तिथे त्याने घडलेला सर्व प्रकार सांगितला.

## दाव्याने सांगतो दोन्ही भाऊ एकत्र आले तरच.. चंद्रकांत खैरे यांचं मोठं विधान

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, छ. संभाजीनगर :** राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जाहीर झाल्या आहेत, प्रचाराला देखील वेग आला आहे. सरकारने त्रिभाषा सूत्राचा अध्यादेश रद्द केला होता, त्यानंतर पहिल्यांदाच शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे हे एकाच व्यासपीठावर आल्याचं पहायला मिळालं.

त्यानंतर आगामी मुंबई महापालिका निवडणूक आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये शिवसेना ठाकरे गट आणि मनसेची युती होणार असल्याची जोरदार चर्चा सुरू झाली, यावर प्रतिक्रिया देताना आता शिवसेना ठाकरे गटाचे नेते चंद्रकांत खैरे यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. दाव्याने सांगतो दोन्ही भाऊ एकत्र आले तरच, मुंबई महापालिका ताब्यात येऊ शकते, असं खैरे यांनी म्हटलं आहे. दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले



तर त्यामुळे मोठा फरक पडेल आणि त्यामुळे मुंबई महापालिकेवर विजयी मिळू शकेल, हे कोणीही नाकारू शकत नाही.

ही मुंबई शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची आहे, त्यांच्यामुळे मुंबई वाचलेली आहे, नाही तर या लोकांनी मुंबई कधीच तोडली असती. तेव्हाचे काँग्रेसचे सरकार असेल किंवा आताचे केंद्र सरकार असेल मुबई कशी काबीज करायची? असा त्यांचा प्रयत्न असतो. पण मराठी माणूस हा मराठी नेतृत्वाकडे पहात आहे, त्यामुळे दाव्याने सांगतो दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आले तर मुंबई महापालिका ताब्यात येऊ शकते. सर्वच राजकीय पक्ष वेगवेगळे लढायला लागले आहेत, पण कुठेतरी ॲडजस्टमेंट करावी लागेल, कारण ही कार्यकर्त्यांची निवडणूक असते, असं यावेळी चंद्रकांत खैरे यांनी म्हटलं आहे. माझी विनंती आहे की, सध्या डाऊन फॉल सुरू असला तरी आपल्याला निवडून येण्यासाठी तडजोड करावी लागेल, नाही तर भाजपा पुन्हा डोक्यावर बसेल. काँग्रेसने अजूनही युतीचा निर्णय घेतला पाहिजे आणि आघाडी धर्म पाळला पाहिजे. काँग्रेस पक्ष स्वतंत्र लढला तर कसा मजबूत होणार? बिहारमध्ये किती जागा लढल्या पण एकच जागा आली. राहुल गांधी यांनी जी मतचोरी दाखवली त्याचा काहीच परिणाम बिहारमध्ये झाला नाही, असंही यावेळी खैरे यांनी म्हटलं आहे.

## कोपरगांवाजवळ भीषण अपघात : विंचूरच्या तरुणाचा होरपळून मृत्यू

### नगर मनमाड महामार्गावर कार- बसची भीषण धडक !

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१५, विंचूर (नाशिक) :** कोपरगाव जवळ कार आणि खासगी बस अपघातात विंचूर येथील तरुणाचा भाजून मृत्यू झाल्याची अत्यंत हृदयद्रावक घटना काल रात्री घडली. असे समजते की, आपल्या बहिणीला आणण्यासाठी कार घेऊन नाशिक जिल्ह्यातील विंचूर येथून कोपरगाव तालुक्यातील पुणतांबा फाटा येथे निघालेल्या तरुणाचा कार आणि खाजगी बसच्या अपघातात मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. अहिल्यानगरमधील कोपरगाव तालुक्यातील नगर-मनमाड महामार्गावर भास्कर वस्ती जवळ १४ नोव्हेंबर रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास भीषण अपघात घडला.

महामार्गावरुन जात असताना कार आणि खाजगी बसची जोरदार धडक झाली. कारने अचानक पेट घेतला आणि काही क्षणातच कार आगीच्या भक्ष्यस्थानी सापडली. या भयंकर आगीत कार चालक जळून जागीच मृत्युमुखी पडल्याची दुर्दैवी घटना घडली. मुजाहिद पप्पू शेख, वय अंदाजे ३० वर्ष, राहणार विंचूर, तालुका निफाड, जिल्हा नाशिक, असे अपघातात होरपळून मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, खाजगी बस शिर्डीवरुन इंदोरच्या दिशेने जात असताना कोपरगाव तालुक्यातील टाकळी फाटाजवळ पोहोचली. समोरुन येवल्याहून कोपरगावच्या दिशेने जाणाऱ्या क्रेटा



वाहनाची समोरासमोर जोरदार धडक झाली. धडकेनंतर बसचा पुढील भाग चक्काचूर झाला तर क्रेटाने पेट घेऊन जळून खाक झाली. बसमधील अनेक प्रवासी किरकोळ जखमी झाले. अपघात होताच प्रसंगावधान राखून बसमधील प्रवाशांनी तातडीने बसमधून उतरुन आपला जीव वाचवला.

घटनास्थळी कोपरगाव नगरपालिकेचे अग्निशमन दल तसेच सहकार महर्षी शंकरराव कोल्हे साखर कारखान्याचे अग्निशामक दल तातडीने दाखल झाले आणि दोन्ही पथकांनी संयुक्तपणे कारवरील आग विझवण्यात यश मिळवले. बसमधील प्रवाशांना स्थानिकांनी मदत केली मात्र क्रेटाने पेट घेतला असता गाडी सीएनजी आहे की काय? अशी चर्चा झाल्यानंतर गाडीजवळ कोणी गेलंच नाही.

दरम्यान अपघाताचे वृत्त समजतात विंचूर गावात शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त होत आहे.

# संपादकीय



## सिंगल युज प्लास्टिकचा मोठा धोका..!

एकदा वापरून फेकून देण्याजोग्या (सिंगल युज) प्लास्टिकचा वापर सर्रास होताना दिसत आहे. सिंगल युज प्लास्टिक मध्ये प्लास्टिकचे कप, पिशव्या, पॉलिथिन, स्ट्रॉ, पाण्याची बाटली, प्लेट, अन्न पदार्थ ठेवण्यासाठी झाकण्यासाठी वापरण्यात येणारे पॅकिंग कागद, प्लास्टिकचे ग्लास, पत्रावळ्या यांचा समावेश होतो. सहज उपलब्ध होत असल्याने जो तो सिंगल युज प्लास्टिकचा वापर करतो. सहज आणि कमी पैशात उपलब्ध होत असल्याने सिंगल युज प्लास्टिकचा वापर वाढला आहे. आपल्या देशात दरवर्षी लाखो टन सिंगल युज प्लास्टिकचा वापर केला जातो. भविष्यात हा आकडा आणखी वाढण्याची शक्यता आहे.

सिंगल युज प्लास्टिकचा कचरा बायोडीग्रेडिबल म्हणजे कंपोस्ट होऊ शकत नाही. सिंगल युज प्लास्टिक जाळूनही नष्ट होत नाही. तो मायक्रो कणांच्या माध्यमातून आस्तित्वात राहतो. सिंगल युज प्लास्टिक जाळण्याचा प्रयत्न केला तर वायू प्रदूषण होते. हा कचरा जमिनीखाली दबला तर पाण्याच्या स्त्रोतांना अडथळा निर्माण करतो. हे सिंगल युज पलिस्टक नदी, विहीर, तलावात टाकले तर जलस्त्रोत खराब होतात. नदीतून वाहून सिंगल युज प्लास्टिक समुद्रात जाऊन साठते. सिंगल युज प्लास्टिकमुळे जलचारांना मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिकचे कण जलचरांच्या पोटात जात असल्याने त्यांचे आस्तीत्वाच धोक्यात आले आहे. सिंगल युज प्लास्टिक नष्ट होत नाही. पाण्यात, जमिनीत मायक्रो कण वर्षानुवर्ष राहतात. सिंगल युज प्लास्टिकमुळे जलप्रदूषणही होते. सिंगल युज प्लास्टिक कचरा कुंडीत टाकला जातो. हा कचरा गुरांकडून खाल्ला जातो. त्यामुळे गुरांना आरोग्याच्या गंभीर समस्या निर्माण होतात. एकूणच सिंगल युज प्लास्टिक मुळे जल, वायू प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

मनुष्यप्राण्यांसह इतर जैवविविधतेला सिंगल युज प्लास्टिकमुळे मोठा धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिकमुळे पर्यावरणालाही धोका निर्माण झाला आहे. सिंगल युज प्लास्टिक मानवी आरोग्यासाठी तसेच जैवविविधतेसाठी हानिकारक असल्याने त्याचा वापरावर सरकारकडून टप्पा टप्प्याने निर्बंध लादले जात आहेत.

निर्बंधासोबतच सिंगल युज प्लास्टिकचे दुष्परिणाम नागरिकांपर्यंत पोहचिण्यासाठी सरकारने जनजागृती करायला हवी. सरकारने सिंगल युज प्लास्टिकचे दुष्परिणाम लोकांना समजावून सांगायला हवेत. शाळा कॉलेजमधून देखील याबाबत प्रबोधन करायला हवे. प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन कारणे आणि सिंगल युज प्लास्टिक वस्तूंचा वापर कमी करणे या दोन्ही विषयी जाणीव जागृती होणे, हे अत्यंत महत्वाचे आहे. सिंगल युज प्लास्टिकमुळे संपूर्ण सजीव सृष्टीलाच धोका निर्माण झाल्याने नागरिकांनीच सिंगल युज प्लास्टिक पासून दूर राहायला हवे. सरकारने सिंगल युज प्लास्टिकवर निर्बंध लादले जात असेल तरी त्याचा वापर कमी होताना दिसत नाही. त्यामुळे या प्लास्टिकचे दुष्परिणाम जाणून घेत नागरिकांनी सिंगल युज प्लास्टिकचा वापर बंद करणे हाच भविष्यात मानवजीवन व जैव विविधता राखण्याचा मार्ग आहे.

# जुन्या लग्न पत्रिकांचे विसर्जन करा !




तुळशी विवाह संपन्न झाले कि सर्वत्र लगीन सराई सुरु आहे. सध्या सर्वत्र लग्नसमारंभांचा माहोल आहे. प्रतिदिन कुठे ना कुठे विवाहाची गाणी, बेण्डबाजाचे स्वर ऐकू येत आहेत. विवाह हा जीवनातील अत्यंत महत्वाचा क्षण मानला जातो. तो क्षण अधिक आनंददायी आणि यादगार व्हावा यासाठी प्रत्येक जण आपापल्या ऐपतीनुसार प्रयत्न करत असतो. विवाह निश्चित झाला कि सर्वात प्रथम कृती केली जाते ती म्हणजे पत्रिका छापण्याची आणि कोणाकोणाला निमंत्रण द्यायचे त्याची यादी तयार करण्याची. पत्रिकेसाठी मजकूर तयार करणे, पत्रिकेत नमूद करायची नावे काढणे, पत्रिकेचे नमुने पाहणे या गोष्टी एकामागोमाग सुरु होतात.

कोकणात पूर्वी विवाहाचे निमंत्रण द्यायला जाताना नारळ घेऊन जात असत. घरातील जेष्ठ मंडळींच्या हातात आदराने श्रीफळ देऊन त्यांचा आशीर्वाद घेतला जात असे. घरातील शुभकार्याला कुटुंबातील सर्वांना उपस्थित राहण्याचे तोंडी निमंत्रण दिले जात असे. पुढे प्रिंटेड पत्रिकांचा जमाना आला. कोणाकोणाला पत्रिका द्यायच्या याची यादी तयार करून कोणाला कोणी आणि कधी पत्रिका द्यायला जायचे याचे नियोजन केले जाते. या संपूर्ण निमंत्रण प्रक्रियेसाठी किमान १५ दिवस राखून ठेवावे लागतात. आता तर सोशल मीडियाचा जमाना आहे. सर्वच कार्यक्रमांचे निमंत्रण व्हाट्सअप च्या माध्यमातून एका सेकंदात एका क्लिकमध्ये सर्वांना पाठवले जाते. हल्ली तर पत्रिकेच्या फोटोसह निमंत्रणाचा व्हिडीओ तयार करून तो पोस्ट केला जातो. फेसबुक, ट्विटर आणि इंस्टाग्रामवर पत्रिकेची इमेज अपलोड करून सर्वांना लग्नाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले जाते. जमाना बदलला असला, निमंत्रण पद्धतीत सोशल मीडियाने अतिक्रमण केले असले, तरी निमंत्रण पत्रिकेचे महत्व अद्याप कमी झालेले नाही हेही खरे. थोड्या का होईना जवळच्या नातेवाईकांना आणि प्रतिष्ठित मंडळींना देण्यासाठी पत्रिका छापल्या जातातच. कुटुंबाच्या ऐपतीनुसार निमंत्रण पत्रिकेचे मूल्य ठरवले जाते. ज्याला बडेजाव दाखवायचा आहे अशी मंडळी एकेका पत्रिकेसाठी १०० ते २०० रुपयेसुद्धा खर्च करतात. अर्थात पत्रिका पाहणारा केवळ लग्नाची तारिख आणि मुहूर्त पाहतो त्यामुळे बाकीच्या शोबाजीला काही अर्थ उरत नाही. सध्या लगीनसराई सुरु असल्याने घरोघरी लग्नाच्या पत्रिका वाटल्या जात आहेत. त्यामुळे प्रत्येकाच्या घरात पत्रिकांचा खच येऊन पडला आहे.

दरवर्षी विवाहाच्या मोसमात घरी येऊन पडणाऱ्या पत्रिकांचे पुढे करायचे काय हा प्रश्न प्रत्येकालाच पडतो. काहीजण त्या रद्दीत देतात तर काही थेट केराच्या डब्यात टाकतात. हिंदू धर्मात लग्नपत्रीकेवर श्री गणेशाचे चित्र छापण्याची किंवा मुखपृष्ठावर गणेशाचे चित्र असलेली पत्रिका विकत घेण्याची प्रथा आहे. गणपतीचे चित्र असलेल्या अशा पत्रिका केराच्या डब्यात टाकल्याने श्री गणेशाचा अवमान होतो. ज्या गणेशाच्या स्मरणाने आणि पूजनाने आपण कोणत्याही शुभकार्याची सुरुवात करतो. ज्या गणेशाला गणेश चतुर्थीच्या काळात मूर्तिरूपाने आपण सन्मानाने घरी आणून त्याची मनोभावे पूजा करतो, ज्याला आपल्या देवघरात अग्रभागी स्थान देतो. त्याच्या कृपेसाठी उपास तापास करतो त्या गणेशाचा अशाप्रकारे होणारा अवमान आपण कधी लक्षातच घेत नाही. रद्दीत दिल्या जाणाऱ्या पत्रिकांचे पुढे काय होते हेही आपणास ठाऊक नसते. देवतेचे नाम अथवा देवतेचे चित्र ज्या ठिकाणी असते त्या ठिकाणी त्या देवतेचे शब्द, स्पर्श, रूप आणि शक्ती कार्यरत असते असे शास्त्र सांगते. त्यामुळे पत्रिकेवरील देवतेच्या चित्राचा सन्मान राखणे आवश्यक आहे. मात्र या पत्रिका साठवून तरी काय करायचे हाही प्रश्न आहेच. अशावेळी पत्रिकेवरील देवतेचे चित्र व्यवस्थित कापून ठेवावे आणि त्या चित्राचे देवघरातील निर्माल्यासोबत वाहत्या पाण्यात विसर्जन करावे, जेणेकरून आपल्या हातून देवतेचा अवमान होणार नाही आणि मनाचेही समाधान होईल. घरी येणाऱ्या श्री सत्यनारायण महापूजेच्या, वास्तुशांतीच्या पत्रिकांचा बाबतीतही आपण वरील प्रमाणे कृती करू शकतो. वर्ष संपत आले आहे, त्यामुळे नवीन कॅलेंडर आपल्या घरी आलेच असेल. जुने कॅलेंडर रद्दीत देताना, त्यांतील देवतांच्या छायाचित्रांची कात्रणे काढून तीसुद्धा निर्माल्यासोबत विसर्जित करूया !

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# गावाकडील हुरडा पार्टी

पार्टीला फक्त एखादं निमित्त हवं ! गावाकडे आम्हां खेडयातील पोरांची पार्टी असायची ती ही अगदी बिनखर्चिक..! आपण बघतो. हल्ली हायवेच्या बाजूला वेगवेगळ्या प्रकारचे फलक लावलेले दिसून येतात.त्यामध्ये जंगलची सफर, हुरडा पार्टी, चुलीवरचे जेवण वगैरे व त्यांचे प्रत्येकी पाचशे ते हजार हजार रुपये पर्यंत शुल्क आकरलेले दिसून येतात.लोकं एक फॅशन म्हणून शनिवार,रविवारी तिथं हजेरी लावतात. मात्र आम्ही खेड्यातील लोकं हे जीवन दररोज अनुभवतोय. निसर्गाच्या सानिध्यात,नदीच्या काठावर,शेताच्या बांधावर त्यामुळे या पार्ट्या म्हणजे काही फारसं नविन असे काही नाही.या नियोजित हुरड्यांच्या पार्ट्या आठवड्यातून एकदाच.मात्र खेड्यात तसं काही नव्हतं. पार्टीला सर्व वार सारखेच अन तेही मनाला पटेल तेव्हा करायचो.

साधारण खरीप हंगामामध्ये गावाकडे मका,मिरची त्याचबरोबर कपाशीचे पीक घेतले जाते.या पिकाबरोबर रिकाम्या जागेत भुईमुंग,चवळी,तूर पेरल्या जाते.रब्बी हंगामामध्ये शाळु,ज्वारी, गहू,हरभरा या पिकांची पेरणी केली जाते.हंगामानुसार शेतातील पिकात दाणे भरणीची वेळ आली किंवा कोवळं-कोवळं असं धान्याचं पीक खाण्यास लायक झालं की,त्याला काड्यांवर भाजून खाण्याची मजा वेगळीच असायची.त्यावर मीठ,लिंबू,मिरची पावडर मसाला मारला की,त्याला अजूनच वेगळी चव यायची. ही शानदार हुरडा पार्टी व्हायची.साधारण खरीपातील मकाचे कणसं दाण्यात आले की,आम्ही पाच-सहा जण जमा होऊन मक्का हुरडा पार्टी करायचो. शाळू,बाजरी,गव्हाच्या ओंब्या,हिरवट,पिवळसर हरभऱ्याचे घाटे भाजून खाणे या प्रकारच्या सुद्धा हुरडा पार्टीचे नियोजन करायचो.हंगामानुसार या हुरडा पार्टीचा काळ वेगळा असायचा. साधारण खरीप हंगामात ऑगस्ट किंवा सप्टेंबर महिन्यात तर रब्बी हंगामात साधारण डिसेंबर,जानेवारी महिन्यात पिकं तयार होऊन पिकातील दाणे मध्यम पूर्ण खाण्यास लायक व्हायचे.त्याला भाजून पार्टी करायचो.हुरडा पार्टीची मज्जा अन भाजण्याची पद्धत जवळपास साधारण सारखीच असायची.

हुरड्यासाठी ज्वारी,मका,शाळू,भुईमुंगाच्या शेंगा अथवा हरभऱ्याचे झाडासहित घाटे आम्ही सर्वांना मनसोक्त पुरेल एवढे शेतातून कापून अथवा हरभरा असल्यास उपटून आणायचो. सर्व मित्रमंडळी मिळून गोठ्याच्या बाजूला पडक्या भिंतीजवळ जमा करुन ठेवलेल्या झाडाच्या काड्या मोकळ्या जागी जमा करायचो.थोड्या बारीक वाळलेल्या गवताच्या काड्या जमा करायचो.कारण त्या मोठया आकाराच्या काड्या लवकर पेट घेत नसत, बारीक वाळलेल्या गवताच्या काडयांना माचीसच्या काडीने पेटवायचो. त्यामुळे त्या लवकर पेट घेई.त्याला हळूहळू तोंडाने फुंकर घालायचो. त्यामुळे इतर काड्या लाकडांचे तुकडे पेटण्यास मदत व्हायची.काड्या व मध्यम आकाराच्या लाकडांनी पेटण्यास जोर धरल्यास त्यातून ज्वाला बाहेर पडायच्या.त्यातून विस्तव तयार व्हायचा.त्या विस्तवावर हुरड्यासाठी आणलेल्या वस्तू जसे की,मकाचा हुरडा असल्यास त्यावरील हिरवट पोपटी आवरण काढून कणसासह त्या ज्वलंत विस्तवावर म्हणजेच हारावर भाजायला टाकायचो.गावाकडे आम्ही त्याला हार म्हणायचो. काड्यांच्या विस्तवामुळे मकांच्या कणसातील नाजूक दाणे लगेच भाजायला सुरुवात व्हायची.ते एकाच बाजूने जास्त भाजल्या जाऊ नये म्हणून,आम्ही पोरं तथा वरिष्ठ मंडळी हातातील लांब काठीने त्यांना हलवायचे. कणसांची जागा पलटवायचे.जेणेकरून ते चहू बाजूने भाजल्या जाईल.दुधाळ,पिवळसर दाणे भाजून काळसर व्हायचे.विस्तवावर भाजलेलं कणीस हाताने किंवा मोठ्या काडीच्या साह्याने विस्तवातून ढकलून बाहेर काढायचो.भाजलेल्या कणसातील लेंडूराच्या आतील भागामध्ये काडी टोचून हातात धरायचो व त्यावर मीठ,लिंबू टाकून खायचो.दाणे हाताने निघाल्यास काढून खायचो नाहीतर डायरेक्ट माकडासारखे कणसाला दातांनी कुडतडून खायचो. भाजलेल्या कणसावर पिळलेलं लिंबू व मिठामुळे एक आगळी वेगळीच चव यायची.त्यामुळे ते कुरतडूनही खाल्लं तरी एक वेगळाच स्वाद यायचा.या स्वादाने मन तृप्त व्हायचं.जिभेला वेगळा स्वाद व अनुभव यायचा.आम्ही पोरं अगदी ढेकर येईपर्यंत एका मागून एक असे दोन-तीन मकाचे कणसं खाऊन घ्यायचो. खरीप हंगामातील मक्याच्या हुरड्या बरोबर रब्बीतील अर्थात हिवाळ्यातील हुरडा म्हणजे हरभरा,गहू, शाळू अर्थात कोवळ्या ज्वारीचे कणसं भाजून हुरडा पार्टी करायचो.त्यांना भाजण्याची प्रक्रिया जवळपास सारखीच. गव्हाच्या ओंब्याच्या हुरड्या साठी ओंब्यां कोवळ्या कोवळ्या कापून आणाव्या लागे. त्या ओंब्या विस्तवावर टाकून त्यांना हातावर चोळावे लागे.दोन्ही हातावर चोळल्यामुळे वरील कचपट निघून जायचे व गव्हाचे कोवळे दाणे शिल्लक राहायचे.ते दाणे एका हातावर घेऊन बाजूला ठेवलेल्या मिठाच्या डब्याच्या झाकणातील मिठावर हलकसं एक बोट ठेवून जिभेवर ठेवायचो.मीठ व भाजलेले कोवळे गहू यांचा रस मिसळ होऊन एक वेगळीच चव यायची. अशी विस्तवातील एक-एक ओंबी काढून हातावर चोळून खायचो. मात्र,आई सगळ्यांसाठी भाजलेल्या ओंब्या जमा करून,बांबूच्या सुफामध्ये टाकून हाताने रगडून घ्यायची.त्यातील ओंब्यांचे कचपट काढून,सुपात जमा झालेला कचपट पाखडून घ्यायची व आम्हाला एक -एक वाटी भरून द्यायची व ती नंतर खायची. शेवटी आईची मायाच ती...! गव्हाबरोबर रब्बी हंगामातच शेतातील हरभऱ्याच्या झाडाची फुले गळून घाटे तयार झाले की,त्यातील मध्यम स्वरूपात तयार झालेले घाट्याचे झाड आम्ही मुळासकट उपटून आणायचो व पेटलेल्या विस्तवावर टाकायचो. झाडाचा पाला जळून जायचा व घाटेसुद्धा वेगवेगळे व्हायचे. थोड्यावेळाने विस्तव थोडा निवल्यानंतर पेटलेल्या भल्या मोठ्या भाजलेल्या हरभऱ्याच्या घाट्यानंभोवती आम्ही मित्र गोल रिंगण करून बसायचो.एकेक घाटा उचलून खायचो.खाताना हात पूर्ण काळेभोर व्हायचे. ओठांच्या अवतीभोवती सुद्धा घाट्यांच्या भाजलेल्या काळ्या रंगामुळे ओठ काळे व्हायचे. घाटे खातेवेळेस काळे झालेले हाताची बोटं कधी गालावर तर कधी कपाळावर उमटायचे. त्यामुळे विदूषकासारखा चेहरा दिसायचा. यावरून एकमेकांची टिंगल उडवायचो. मात्र त्यातही खूप मजा होती, कारण तो आनंद स्वाभाविक होता.उपजत होता.त्याला कुठलाही कृत्रिमपणा नव्हता.मनमोकळं, बिनधास्त जीवन जगायचो.या गव्हांच्या ओंब्या व हरभऱ्याच्या हुरडा पार्टीबरोबर हिवाळ्यातील ज्वारी भाजूनसुद्धा छान अशी हुरडा पार्टी आम्ही करायचो. ज्वारीच्या धांड्याचे वरील बाजूचे हिरवट,पोपटी कणीस विळ्याने कापून आणायचो. पेटलेल्या विस्तवावर हलकसं मंद आचेवर भाजायला ठेवायचो.कणिसाचा धांडा लांब असल्यास,हातात धरून विस्तवावर गोल-गोल फिरवायचो. त्यामुळे कणीस चहूबाजूने चांगले भाजायचे. भाजतांना छान, खमंग वास यायचा.भाजलेल्या कणसाला दोन्ही हातावर चोळून त्यातील कचपट, बारीक कचरा तोंडाने फुंकर मारून ज्वारीचे किंवा शाळुचे कोवळे दाणे खाताना खूप छान वाटायचे. वावरातला गावरान मेवा मन तृप्त करायचा.ती चव तो सुगंध अजूनही कायम स्मरणात आहे.

गावाकडील हंगामानुसार या हुरडा पार्टीतील काही भुईमुगाच्या शेंगा,तुरीच्या शेंगा,उकडून खाण्याच्या सुद्धा आमच्या पार्ट्या असायच्या.चवळी,उडीद,मुग सुद्धा विस्तवावर भाजून खायचो,कारण गरिबीचा काळ होता. कसंतरी पोटाची आग विजवणे. हा उद्देश होता. मात्र त्याबरोबर त्यातील आनंद हा आगळावेगळा होता. जन्मदात्या आईबरोबर काळी आई उदरात पिकवलेल्या पीकाने आमची पोटाची आग विझवायचीच...! जरी या उपक्रमांना हल्ली हुरडा पार्टी, जंगलची सफर,शेत-सहल म्हणत असले, तरी मात्र आम्हां खेड्यातील लोकांसाठी हे सततच असलं तरी त्यातून दररोज नाविन्याची ओळख होत होती. प्रत्येक प्रसंगातून जगण्याची नवीन शिकवण व नवीन अनुभूती येत होती.निमित्त जरी हुरडा पार्टीचं असलं तरी, त्यातील स्नेहमीलन,मैत्रीचा सुखद अनुभव,गरिबीची जाणीव हे सर्व संमिश्र होतं.

अशीही गावाकडील खरीप व रब्बीतील विशेषता हिवाळ्यातील हुरडा पार्टी खूप आनंददायी असायची. मित्रमंडळी व सवंगड्यासोबत हुरडापार्टीसाठी जमा केलेल्या वस्तूंपासून ते सर्व जाती-धर्मांच्या मित्रांसोबत एकत्रितपणे भगवान श्रकृष्ण परमात्मा यांच्या गोपाळकाल्याप्रमाणे हुरड्याचा घेतलेला सुखद अनुभव ही सहकार्य व एकात्मतेची भावना रुजवण्याचे माध्यम होतं. अशी ही हुरडा पार्टी आनंदाबरोबर एकात्मतेचे प्रतिक होते.गावाकडे अजूनही हे अनुभवायला मिळतं. चला तर, मित्रांनो! नोकरी, धंदा,व्यवसाय निमित्त तुम्ही कुठेही असा.वर्षातून एकदा गावाकडे जाऊन हुरडा पार्टीचा मनमुराद आनंद घ्या...!

**- श्री विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ ता.जि.बुलडाणा**
**मो.नं. ९७६३२८२०७७**

## राष्ट्र...

स्वहित सर्वांत नंतर
सर्वोच्च मानावे राष्ट्र
लयांस नेई साम्राज्य
एकचंपुरेसा धृतराष्ट्र

असो वाद आपसांत
कारस्थान करी दुष्ट
कधीकधी मित्रांतही
येऊ शकते ते वितुष्ट

अस्वस्थ हो नागरिक
देशांवरी येता आरिष्ट
उभेराहतो सक्षमपणे
दुर्बळही दावी धारिष्ट

स्वार्थ रे प्रियतम शत्रु
साधू पाही स्व उदिष्ट
विषारी अपेक्षा दूरावे
असूद्या भले स्वादिष्ट

प्रत्येकाचा भिन्नझेंडा
पक्ष वाटतो सर्वं श्रेष्ठ
बाजू ठेवून पक्ष हीत
तिरंग्याशीचंएकनिष्ठ

राष्ट्रगीत स्फुर्तीदायी
लहानगाही आकृष्ट
नागरिकसुजाण जो
राष्ट्रा बनवेल उत्कृष्ट

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

## प्रेरणादायी चारोळी

**हातावरच्या रेषांवर**
**कधीच विश्वास ठेवू नका,**
**कारण भविष्य तर त्यांनाही**
**असते ज्यांना हात नसतात.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## आमदार दाते यांच्यावर मोठी जबाबदारी

### अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, अहिल्यानगर :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी पक्षाचे जेष्ठ आमदार काशिनाथ दाते यांची अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक प्रभारी म्हणून नियुक्ती केली आहे. या नियुक्तीबाबत प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी अधिकृत पत्र जारी केले आहे. येत्या काळात नगरपरिषद, नगरपंचायत, जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी आणि निवडणुकीच्या तयारीस गती देण्यासाठी ही नियुक्ती करण्यात आली असल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे.

पत्रात म्हटले आहे की, नुकत्याच नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांची प्रक्रिया सुरू झाली आहे. या निवडणुकांच्या दृष्टीने योग्य नियोजन करून पक्षाचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचे समन्वय राखण्यासाठी काशिनाथ दाते यांच्या नेतृत्वाखाली निवडणुकीची जबाबदारी सोपविण्यात येत आहे. या नियुक्तीमुळे अहिल्यानगर शहरासह पारनेर तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये आणि जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला नवचैतन्य लाभेल, असा विश्वास स्थानिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. काशिनाथ दाते यांच्या या नियुक्तीबद्दल जिल्ह्यातील कार्यकर्त्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, नगर शहरातील आगामी निवडणुकांमध्ये पक्षाच्या विजयासाठी ते निर्णायक भूमिका निभावतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## टाकळी ढोकेश्वरमध्ये बिबट्याच्या वारंवार दर्शनाने नागरिकांची हवा टाईट

### बिबट्याचे हल्ले अन् सुस्त वनविभाग !



* कोणतीही दुर्घटना टाळण्यासाठी वनविभागाने तातडीने पिंजरा लावावा अशी मागणी कृष्णा बांडे, सचिन बांडे किरण धुमाळ आप्पा झावरे यांनी ग्राम पंचायतीच्या मार्फत वनविभागाला केली आहे. वनविभागाने तातडीने कारवाई न केल्यास जीवितहानी होण्याची शक्यता देखील तेथील स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री बिबट्याचे घडल्याने सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले आहे. आप्पा झावरे हे व्यवसाय करून घरी परतत असताना आहेरओढा येथे त्यांच्या दुचाकी गाडीला बिबट्या अचानक आडवा आला, ज्यामुळे त्यांना प्रचंड धक्का बसला. तसेच दोन दिवसांपूर्वी सायंकाळी ६ वाजता योगेश पायमोडे आणि शाळकरी मुलांना याच भागात बिबट्या आडवा आला होता, त्यामुळे परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. परिसरातील नागझरी, आहेरओढा, बांडे वस्ती, धुमाळ वस्ती, पानशेत, गव्हाळी, ढुसदरा, बेटवस्ती भागात सातत्याने बिबट्याचा वावर वाढला आहे.

बिबट्याचे वारंवार दर्शन होऊ लागल्यामुळे ग्रामस्थ व वाड्या वस्त्यांवर असलेल्या शेतकरी वर्गात घबराटीचे वातावरण पसरले आहे. बिबटे नागरी वस्तीमध्ये येऊन वाढत्या पशुधनांवरील हल्ल्यांमुळे नागरिक भयभीत होऊन त्रास झाले आहेत. सायंकाळी अंधार पडल्यावर अनेकांनी घराबाहेर पडण्यास धजावत नाही. विशेष म्हणजे, परिसरात बिबट्यांची संख्या ९ ते १० असावी, असा ग्रामस्थांचा कायास आहे. मात्र, याबाबत वन विभाग सुस्त असल्याचे दिसून येते आहे.

वनविभागाने या भागात सध्या पिंजरा लावला असल्याचे सांगितले. बांडे वस्ती परिसरातील त्रस्त लोकांकडून आणखी दोन पिंजरे लावून बिबट्याला पकडण्याची मागणी केली जात असली तरी वन विभाग त्या बाबतीत गांभीर्याने घेत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

नगर तालुक्यातील खारेकर्जुने येथे पाच वर्षाच्या चिमुरडीवर बिबट्याने हल्ला करून तीच्या नरडीचा घोट घेतला. त्यामुळे नागरिकांनी आक्रमक होत वनविभागाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली आहे. काही दिवसांपूर्वी गव्हाळी, नागझरी परिसरात बिबट्याने पवन झावरे यांच्या पाळीव कुत्र्यावर हल्ला केला होता. तसेच आहेरओढा भागात लगतच्या माळी वस्तीपर्यंतच्या ४ – ५ पाळीव कुत्र्यांचा फडशा पाडला. एवढेच नाहीतर बांडे – खोडदे शिवस्ता येथील ओढ्यात दिवसाढवळ्या बिबट्याने अनेकांना दर्शन दिले.

उसाच्या शेतात तसेच रस्त्यावर बिबटे दिसत असल्यामुळे शेतात गवत घेण्यासाठी जाणाऱ्या महिलांनी बिबट्याच्या भितीने गवत घेणे ही बंद केले आहे. काही दिवसांपूर्वी गव्हाळी परिसरात बिबट्याने वासरावर हल्ला करून ठार केले होते. असे ही असतानाही परिसरात अनेक ठिकाणी बिबट्यांचे दर्शन होत असल्यामुळे परिसरात बिबटे जेरबंद करण्यासाठी पिंजरे लावण्याची मागणी सरपंच अरुणा खिलारी व शेतकरी वर्गाकडून केली जात आहे.

## शेती पंपासाठी दिवसा वीज पुरवठा करा

### वडगाव सावताळ चेअरमन शिवाजी रोकडे यांची मागणी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१५, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील वडगाव सावताळ येथील शेतकऱ्यांनी शेतीपंपासाठी दिवसा वीज पुरवठ्याची मागणी केली आहे. सध्या परिसरात बिबट्यांचा वावर वाढल्याने रात्री शेतात पाणी भरणे धोकादायक बनले आहे. यामुळे शेतकरी भयभीत असून, त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी वडगाव सावताळ सेवा सोसायटीचे चेअरमन शिवाजी रोकडे यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांनी टाकळी ढोकेश्वर येथील महावितरण कार्यालयात निवेदन सादर केले.

निवेदनात म्हटले आहे की, बिबट्यांच्या हल्ल्याच्या भीतीमुळे शेतकरी रात्री शेतात जाण्यास घाबरत आहेत. त्यामुळे शेतीपंपासाठी दिवसा वीज पुरवठा उपलब्ध करून द्यावा, जेणेकरून शेतकऱ्यांना सुरक्षितपणे शेतीचे काम करता येईल. यावेळी माजी सभापती अरुणराव ठाणगे, उद्योजक भगवान वाळुंज, लहू जाधव, महादू रोकडे, संकेत झावरे, जयवंत वाळुंज, नामदेव रोकडे गुरुजी, वामन रोकडे, सागर निवडुंगे, सागर करगळ, अमोल मोरे यांच्यासह वडगाव सावताळ व परिसरातील अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

## निवडणुकीची कामे जबाबदारीने पार पाडा; जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली नोडल अधिकाऱ्यांची बैठक




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील १० नगरपरिषद आणि एका नगर पंचायतीची सार्वत्रिक निवडणूक ०२ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे. या निवडणुकीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज असून विविध कामांसाठी नोडल अधिका-यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व यंत्रणांनी निवडणुकीची कामे जबाबदारीने पार पाडावीत, अशा सुचना जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित नोडल अधिका-यांच्या बैठकीत ते बोलत होते.

पुढे जिल्हाधिकारी गौडा म्हणाले, निवडणूक यंत्रणेशी संबंधित सर्व अधिकारी कर्मचा-यांनी योग्य रितीने आपले कर्तव्य बजावावे. यासाठी सुक्ष्म नियोजन करा. निवडणुकीच्या कामांमध्ये कोणताही निष्काळजीपणा होऊ देऊ नका. त्यासाठी पुर्वतयारी करून ठेवा, अशा सुचना त्यांनी दिल्या.

यावेळी मतदान कर्मचारी/मनुष्यबळ व्यवस्थापन कक्ष, साहित्य मागणी व वितरण, मतपत्रिका, मतदार यादी, वाहन व्यवस्थापन, संगणक सुरक्षा आयटी ॲप्लीकेशन, मतदार जनजागृती, कायदा–सुव्यवस्था व सुरक्षा नियोजन, ईव्हीएम मशीन व्यवस्थापन, आचारसंहिता / ऑनलाईन तक्रार निवारण, खर्च नियंत्रण, टपाली मतपत्रिका छपाई, माध्यम व सनियंत्रण, समन्वय जिल्हा निवडणूक संपर्क कक्ष, तक्रार निवारण व मतदार मदत कक्ष व नियंत्रण कक्ष, निवडणूक निरीक्षक, दिव्यांग मतदार मदत व सनियंत्रण कक्ष आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. बैठकीला मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, अतिरिक्त जिल्हाधिकारी डॉ.नितीन व्यवहारे, अपर पोलिस अधिक्षक ईश्वर कातकाडे, निवासी उपजिल्हाधिकारी दगडू कुंभार, प्रभारी मनपा आयुक्त डॉ. विद्या गायकवाड, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) शुभम दांडेकर, उपजिल्हाधिकारी संजय पवार, कार्यकारी अभियंता अक्षय पगारे, जिल्हा पुरवठा अधिकारी राहुल बहादुरकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गिरीश धायगुडे, मिना साळूंके, प्रादेशिक परिवहन अधिकारी किरण मोरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अतुल गायकवाड आदी उपस्थित होते.

**या नगरपरिषद / पंचायतमध्ये होणार निवडणूक :-**

चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर, भद्रावती, वरोरा, ब्रम्हपुरी, घुग्घुस, राजुरा, गडचांदूर, चिमूर, मूल, नागभीड येथील नगर परिषद तर भिसी येथील नगर पंचायतीसाठी ०२ डिसेंबर २०२५ रोजी निवडणूक होणार आहे. वरील नगर परिषद आणि नगर पंचायतीमध्ये एकूण प्रभागांची संख्या १३३ असून निवडून द्यावयाच्या सदस्यांची संख्या २५३ आहे.

या निवडणुकीसाठी एकूण मतदार लोकसंख्या ३ लक्ष ७१ हजार ५३७ असून यात पुरुष मतदार १ लक्ष ८७ हजार १३९ तर स्त्री मतदार १ लक्ष ८४ हजार ३८७ आहे. अन्य मतदारांची संख्या ११ आहे.

## चंद्रपूर तालुक्यात एकुण १ हजार २६५ शेतकरी नुकसान भरपाई पासून वंचित



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** अवकाळी पाऊस व अतिवृष्टीने चंद्रपूर जिल्हात शेतपिकांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसान भरपाई मिळण्यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजुरकर यांच्या नेतृत्वात निवासी जिल्हाधिकारी कुंभार साहेब यांचेकडे निवेदन सादर केले आहे. चंद्रपुर तालुक्यातील १ हजार २६५ नुसकानग्रस्त शेतकऱ्यांचे अतिवृष्टीची मदत निधी प्रलंबित आहे. त्यामुळे रब्बी हंगामाची पेरणी करण्यासाठी शेतकऱ्यांना सावकाराकडून कर्ज काढण्याची वेळ आली आहे. चंद्रपूर जिल्हात अतिवृष्टी मुळे मोठे नुकसान झाले आहे. चंद्रपुर तालुक्यातील नुकसान झालेल्या १ हजार २६५ शेतकऱ्यांना अजुन पर्यंत शेतकऱ्याला अतिवृष्टी ची रक्कम खात्यात आली नाही आहे. महसुल व वन विभागा अंतर्गतदिनांक १० ऑक्टोंबर २०२५ च्या महाराष्ट्र शासन निर्णयात ज्या शेतकऱ्याची अग्रीस्टॅक मध्ये नोदणीं नाही, अशाना सुद्धा नुकसान भरपाई देणे गरजेचे आहे, असे शासन निर्णयात नमुद आहे. मात्र त्यांना अद्यापही नुकसान भरपाई मिळालेली नाही. त्यांना त्वरीत अतिवृष्टीची रक्कम देण्यात यावी ही मागणी गणेश आवारी संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती चंद्रपूर, गिरीश मुसळे, देविदास येरगुडे, योगेश्वर पिपंळकर, बंडू बेरड, विनोद पिंपळकर, नामदेव पिंपळकर, रंगराव पवार, रामकिसन पाचभाई, देविदास येरगुडे, गणेश येरगुडे, आशिष मुसळे, विठ्ठल पिपळकर, रामराव देवतळे यांचेसह नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

## आ.जोरगेवारांच्या नेतृत्वात शेनगाव येथील सरपंचांसह महिला, युवकांचा भाजपात प्रवेश



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** आमदार किशोर जोरगेवार यांच्या जनसंपर्क कार्यालयात झालेल्या पक्ष प्रवेश कार्यक्रमात आ. किशोर जोरगेवार यांच्या नेतृत्वात शेनगाव येथील सरपंच पुष्पाताई मालेकर, संभाजी ब्रिगेड आणि काँग्रेसच्या कार्यकर्त्यांसह अनेक महिला व युवकांनी नुकताच भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. यावेळी आ.किशोर जोरगेवार यांनी सर्व नवनियुक्त सदस्यांच्या गळ्यात पक्षाचा दुपट्टा घालून त्यांचे स्वागत केले.

यावेळी विधानसभा अध्यक्ष वंदना हातगावकर, जिल्हा महामंत्री नामदेव डाहुले, महामंत्री श्याम कनकम, सविता दंढारे, तालुका अध्यक्ष विनोद खेवले, युवा मोर्चा अध्यक्ष आशिष वाढई, मंडळ अध्यक्ष प्रदीप किरमे, गौरव गोहणे, गौरव ठावरी, मनोज जाधव यांची उपस्थिती होती. मोठ्या संख्येने झालेल्या या प्रवेशामुळे तालुक्यातील भाजपाची संघटनशक्ती आणखी बळकट झाल्याचे चित्र दिसून आले. शेनगाव येथील सरपंच पुष्पाताई मालेकर यांच्यासह सुवर्णा बोबडे, शिवानी मडावी, लता मालेकर, कमलाबाई ताजने, मीरा मासिरकर, सुनीता बांदूरकर, मनिषा मासिरकर, कल्पना मेसेकर यांचा पक्षप्रवेश झाला. सोनेगाव येथील स्वप्नील बांदुरकर, सोनाली वराट्रे, शुभांगी गोहणे, वैशाली बोबडे, रेखा चटकी, साधना गावडी, नमित गोहणे, स्वप्नील कौराशे, नामेश येरगुडे, गणेश काकडे, विकास गोहणे, गणेश बोबडे, अतुल पिंगे, स्वप्नील जोगी यांचा तसेच महाकुर्ला येथील रोशन भोयर, कुणाल भोयर, मनोज बोधे, हितेश वाटेकर, ओम भोयर व रंजित बोबडे यांचा भाजपात प्रवेश झाला.

यावेळी आ. किशोर जोरगेवार म्हणाले की, आज शेनगाव, सोनेगाव आणि महाकुर्ला येथील मोठ्या संख्येने महिला, युवक आणि सरपंचांनी भारतीय जनता पक्षावर ठेवलेला विश्वास हा आमच्यासाठी अतिशय अभिमानाचा क्षण आहे. भाजपा हा केवळ राजकीय पक्ष नसून विकास, पारदर्शकता आणि सामान्य नागरिकांच्या प्रगतीसाठी लढणारी सशक्त लोकशाही चळवळ आहे. ते पुढे म्हणाले, आपल्या प्रत्येक गावाच्या प्रगतीसाठी आम्ही कटिबद्ध आहोत. चंद्रपूर तालुक्यातील रस्ते, पाणी, वीज, आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या संधी वाढवण्यासाठी गेल्या काही वर्षांत आम्ही प्रामाणिक प्रयत्न केले आणि पुढेही त्यात वाढ करत राहू. महिलांच्या सक्षमीकरणासाठी आणि युवा वर्गाला संधी देण्यासाठी भाजपा योग्य ते निर्णय घेत आहे, असेही ते म्हणाले. पक्षाच्या विकासाभिमुख कामावर, तसेच चंद्रपूरचे आ. किशोर जोरगेवार यांच्या नेतृत्वावर ठेवलेल्या विश्वासातून हा प्रवेश झाल्याचे जिल्हा महामंत्री नामदेव डाहुले यांनी सांगितले. यावेळी भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## श्री टाकेश्वर मठ येथे वार्षिक पायी दिंडी सोहळा

**अक्षराज : अक्षय गिरा**

**दि.१४, शहापूर (ठाणे) :** सालाबादप्रमाणे श्री विठ्ठल–रुक्मिणी दत्त देवस्थान ठूणे ते श्री क्षेत्र टाकेश्वर मठ दरवर्षीप्रमाणे यंदाही पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या दिंडीचे विशेषत्व असे की, संत सम्राट महावैष्णव श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या माझे जीवाची आवडी पंढरपुरा नेईईल गुढी या उक्तीप्रमाणे भक्तिभावाने व उत्साहात या सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे. ब्रह्मलीन शांतीस्वरूप महान योगी सद्गुरु ऋद्धिनाथ बाबा, गुरु शीलनाथ बाबा, योगी विश्वनाथ बाबा, गुरु ऋद्धिनाथ बाबा तसेच योगी फुलनाथ बाबा यांच्या कृपाशिर्वादाने या दिंडीचे आयोजन होत आहे. बेडिसगाव, नारायणगाव, मळेगाव, ठूणे, दलालपाडा, लवले, कपालेश्वर मठ, आष्टे व टाकेश्वर मठ या परिसरातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. ही पवित्र दिंडी शनिवार, दि.१५ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता बेडिसगाव येथून निघणार असून टाकेश्वर मठ येथे समारोप होईल. भक्तगणांनी या दिंडी सोहळ्यात सहभागी होऊन सद्गुरुंच्या कृपाशिर्वादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक श्री क्षेत्र टाकेश्वर भक्त व सत्संग परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## चंद्रपूर वन अकादमीला ग्रिहा कौन्सिलकडून थ्री स्टार सन्मान

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** पर्यावरणपूरक उपक्रम आणि ऊर्जा बचतीच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल चंद्रपूर वन अकादमीला ग्रिहा कौन्सिल, टेरी, नवी दिल्ली यांच्याकडून थ्री स्टार मानांकन प्रदान करण्यात आले आहे. अकादमीने गेल्या काही वर्षापासून राबविलेल्या पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासावर आधारित उपाययोजनांमुळे पुढीलप्रमाणे बचत साध्य झाली आहे.

यात वीज बचत ४५९७ मेगावॅट प्रति तास प्रति वर्ष, हरितगृह वायू उत्सर्जन घट ३७६९ मेट्रिक टन, कार्बन डॉयऑक्साईड समतुल्य प्रति वर्ष, पाणी बचत १९९११० किलोलिटर प्रति वर्ष देशातील एकमेव वन प्रशिक्षण संस्था तसेच महाराष्टातील एकमेव शासकीय प्रशिक्षण संस्था म्हणून या या सन्मानाने चंद्रपूर वन अकादमीने इतिहास रचला आहे. हा सन्मान महाराष्ट्र वन विभागाच्या मुकुटातील आणखी एक मानाचा तुरा ठरला असून राज्यातील पर्यावरणपूरक विकैसाच्या दिशेने हे एक प्रेरणादायी पाऊल मानले जात आहे.

या यशाचे श्रेय वन अकादमीचे संचालक श्रीनिवास रेड्डी, अपर संचालक (प्रशिक्षण) उमेश वर्मा, व इतर अधिकारी कर्मचारी यांना जाते. संचालक रेड्डी त्यांच्या दूरदृष्टी पर्यावरणाबद्दलची संवेदनशील दृष्टी व अथक प्रयत्न आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळेच ही अभूतपूर्व कामगिरी साध्य झाल्याचे अपर संचालक उमेश वर्मा यांनी कळविले आहे.

# चंद्रपूर जिल्ह्यातील ५ नगरपालिकेच्या सत्तेची दोरी महिलांच्या हाती

## पुरुषापेक्षा अधिक महिला मतदारांची संख्या; ५ नगरपालिकेत महिलांना नगराध्यक्षांची संधी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यात येत्या ०२ डिसेंबरला १० नगरपालिका व १ नगरपंचायतमध्ये सार्वत्रिक निवडणूक होऊ घातली आहे. ११ नगराध्यक्षासह २५३ नगरसेवकांच्या निवडीवर ३ लक्ष ७१ हजार ५३७ मतदार शिक्कामोर्तब करणार आहे. यातील ५ नगरपालिकेत पुरुष मतदारांच्या तुलनेत महिलांची संख्या अधिक आहे. त्याच प्रमाणे ५ नगरपालिकेत सार्वत्रिक निवडणूकी नंतर नगराध्यक्ष पदाची संधी महिलांना मिळणार आहे.

आता मात्र मतदारांच्या संख्येवरून पाच नगरपालिकेत सत्तेची दोरी महिलांच्या हाती असल्याचे वास्तव मतदारांचा संख्येवरून दिसून येत आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर, भद्रावती, वरोरा, ब्रम्हपुरी, मुल, राजुरा, घुग्घुस, गडचांदूर, नागभीड, चिमूर या नगरपालिकेत व भिसी येथील एकमेव नगरपंचायत मध्ये सार्वत्रिक निवडणूक उमेदवारी अर्ज दाखल प्रक्रिया सुरु झाली आहे. येथे २ डिसेंबरला मतदान होणार आहे. यातील वरोरा मध्ये ३२७, मुल ४७२, राजुरा २०६, नागभीड ५०६ व चिमूर नगरपालिकेत २०७ असे पुरुष मतदानाच्या तुलनेत महिलांची मतदार संख्या अधिक असल्याचे दिसून येत आहे. यामुळे या नगरपालिकेत सार्वत्रिक निवडणूक सत्तेची दोरी महिलांच्या हाती आली आहे. जो राजकीय पक्ष महिला मतदारांना गोंजारण्याचे काम करेल. त्या पक्षाला निवडणुकीत फायदा होणार, असे चित्र दिसत आहे.




बल्लारपूर नगरपालिकेत १७ प्रभागातून नगराध्यक्ष पदासह ३४ नगरसेवकांची निवड ८३ हजार ८२१ मतदार करणार आहेत. यामध्ये ४१ हजार ७५४ महिला, तर ४२ हजार ६६ पुरुष मतदारांचा समावेश आहे. वरोरा मध्ये १३ प्रभागातून नगराध्यक्ष व २७ नगरसेवकांच्या निवडीवर ४३ हजार ३२९ मतदार शिक्कामोर्तब करणार आहे. येथे २१ हजार ८२६ महिला, तर २१ हजार ४९९ पुरुष मतदार निर्धारित करण्यात आले आहे. येथे पुरुष मतदारांच्या तुलनेत महिलांची संख्या ३२७ अधिक आहे. मुल नगरपालिकेत १० प्रभागातून नगराध्यक्ष व २० नगरसेवकांची निवड २१ हजार ७४५ मतदार करतील. यामध्ये ११ हजार १०८ महिला, तर १० हजार ६३६ पुरुष मतदारांची संख्या आहे. येथे पुरुष मतदारांच्या तुलनेत महिला मतदारांची संख्या ४७२ अधिक आहे. राजुरा नगरपालिकेत नगराध्यक्ष व २१ नगरसेवकांच्या निवडीवर २६ हजार ८५५ मतदार शिक्कामोर्तब करणार आहे. यामध्ये १३ हजार ५३० महिला, तर १३ हजार ३२४ पुरुष मतदार आहे. येथे देखील पुरुष मतदारांपेक्षा २०६ महिला मतदारांची संख्या अधिक आहे. नागभीड मध्ये एकूण १० प्रभाग असून नगराध्यक्ष व २० नगरसेवकांची निवड २० हजार ९९२ मतदार करणार आहेत. येथे महिला मतदारांची संख्या १० हजार ७४९, तर पुरुष मतदार म्हणून १० हजार २४३ संख्या आहे. येथे पुरुष मतदारांच्या तुलनेत महिला मतदारांची संख्या ५०६ अशी सर्वाधिक आहे. चिमूर मध्ये १० प्रभाग असून नगराध्यक्ष व २० नगरसेवकांच्या निवडीवर २२ हजार ५५७ मतदार शिक्कामोर्तब करणार आहे. यात महिला मतदारांची संख्या ११ हजार ३९२ इतकी, तर पुरुष मतदार ११ हजार १६५ इतके आहे. येथे महिला मतदारांची संख्या २०७ अधिक आहे. भद्रावती नगरपालिकेत १४ प्रभागातून नगराध्यक्ष व २९ नगरसेवकांची निवड ५२ हजार ५७२ मतदार करणार आहेत. येथे महिला मतदारांची संख्या २६ हजार १५, तर पुरुष मतदार २६ हजार ५५७ इतके आहे. ब्रम्हपुरी नगरपालिकेत ११ प्रभाग असून नगराध्यक्ष व २३ नगरसेवकांच्या निवडीवर ३३ हजार ७७९ मतदार मतदानातून शिक्कामोर्तब करणार आहे. येथे १६ हजार ४३१ महिला, तर १७ हजार ३४८ पुरुष मतदारांची संख्या आहे. घुग्घुस नगरपालिकेत ११ प्रभाग असून नगराध्यक्ष व २२ नगरसेवक ३२ हजार ४८८ मतदार मतदानातून निवडतील.

यामध्ये १५ हजार ५६७ महिला, तर १६ हजार ९१७ पुरुष मतदारांचा समावेश आहे. गडचांदूर नगरपालिकेत १० प्रभागातून नगराध्यक्ष व २० नगरसेवकांच्या निवडीवर २४ हजार ४५७ मतदार मतदानातून शिक्कामोर्तब करणार आहे. भिसी नगरपंचायत मध्ये १७ प्रभागातून नगराध्यक्ष व १७ नगरसेवक ८ हजार ९४२ मतदार निवडणार आहेत. येथे महिला मतदारांची संख्या ४ हजार ४५८, तर पुरुष मतदार ४ हजार ४८४ आहेत. जिल्ह्यातील १० नगरपालिका व १ नगरपंचायत मध्ये एकूण प्रभाग १३३ असून ११ नगराध्यक्षासह २५३ नगरसेवकांच्या निवडीवर ३ लक्ष ७१ हजार ५३७ मतदार मतदानातून शिक्कामोर्तब करणार आहे. यामध्ये १ लक्ष ८४ हजार ३८७ महिला, तर १ लक्ष ८७ हजार १३९ पुरुष मतदारांचा समावेश करण्यात आला आहे.

# प्रत्येक जिल्ह्यात पत्रकारांसाठी 'एआय' प्रशिक्षण कार्यशाळा घेणार - मंत्री लोढा

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१५, मुंबई :** प्रत्येक क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर आणि त्याचे महत्व लक्षात घेऊन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागातर्फे पत्रकारांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता विषयक कार्यशाळा हा नवा उपक्रम राबवला राबविण्यात येत असून कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात पत्रकारांसाठी विशेष एआय प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात येणार असल्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ आणि मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मंत्रालय येथील पत्रकार कक्षात एआय संदर्भात चार दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले. समारोप कार्यक्रमात रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ.अपूर्वा पालकर, एआय तज्ज्ञ किशोर जशनानी, उपकुलसचिव राजेंद्र तलवारे, मंत्रालय व विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, सरचिटणीस दिपक भातुसे, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाचे प्रशिक्षक लोमेश नारखेडे, सल्लागार गजानन हेगडे, वरिष्ठ सल्लागार आशिष शीवास्तव, प्रशासकीय सहाय्यक ऋषी देठे, शॉर्ट टर्म कोर्सेसचे शुभम शेंडे, श्रावणी कोचरे, भूषण पवार तसेच प्रिंट, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल माध्यमांचे पत्रकार उपस्थित होते.दिनांक ११ ते १४ नोव्हेंबर २०२५ दरम्यान मंत्रालयात आयोजित या कार्यशाळेत एआय साधनांचा पत्रकारितेसाठी वापर, वृत्ताची पडताळणी, माहिती शोधण्याची गती, तसेच डिजिटल कामकाजातील अचूकता आणि सुलभता याविषयी पत्रकारांना मार्गदर्शन मिळाले. या प्रशिक्षणाला पत्रकारांकडून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता हा उपक्रम राज्यभर नेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.




त्यानुसार जिल्हा व तालुका स्तरावर काम करणाऱ्या पत्रकारांना आधुनिक एआय साधनांची ओळख आणि त्यांचा वापर प्रत्यक्ष शिकण्याची संधी उपलब्ध होणार आहे.या निर्णयाबद्दल कौशल्य मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले, आज प्रत्येक पत्रकारावर बातमीच्या वेगासोबतच तिची अचूकता टिकवण्याची जबाबदारी वाढली आहे. अशावेळी एआय ही केवळ तांत्रिक सुविधा नाही, तर कामाला नवी धार देणारे साधन आहे. राज्यातील प्रत्येक पत्रकार अधिक सक्षम व्हावा, हा या उपक्रमामागचा उद्देश आहे. या माध्यमातून पत्रकारांद्वारे जनतेचे प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडले जातील आणि हेच या उपक्रमाचे खरे यश ठरेल, राज्यात अशा प्रकारचा हा पहिलाच उपक्रम असून याचबरोबर रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठात 'एआय फॉर न्यूज' या विषयाचा चार महिन्यांचा डिप्लोमा अभ्यासक्रम सुरू करण्याची सूचना आली असून याबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल, असेही लोढा यांनी सांगितले.चार दिवसीय कार्यशाळेत कृत्रिम बुद्धिमत्ता तज्ञ किशोर जशनानी यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता वापरताना द्यायचे प्रॉम्प्ट, चॅट जीपीटीला असलेले पर्याय, त्याचप्रमाणे पत्रकारितेसाठी इतर सहायक टूल्स बनविणे. फोटोवरून बातमी करणे, फोटोवरून व्हिडिओ लेखन बनविणे, न्यूज रिपोर्ट बनविणे, प्रिंट, इलेक्ट्रॉनिक व डिजिटल मीडियासाठी बातमी लेखन त्याचप्रमाणे चॅट पीडीएफ चा वापर याबाबत माहिती दिली. रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. अपूर्वा पालकर म्हणाल्या की, 'एआय' फॉर न्यूज या विषयाचा डिप्लोमा सुरू करण्याची सूचना आली असून याबाबत सकारात्मक विचार करण्यात येईल. कृत्रिम बुद्धिमत्ता ही कार्यशाळा सर्व पत्रकारांना त्यांच्या दैनदिन कामात अत्यंत उपयुक्त ठरेल. पत्रकारांचा या कार्यशाळेला खूप चांगला प्रतिसाद मिळाला. एआय पत्रकारिता कार्यशाळेमध्ये सहभागी झालेल्या पत्रकारांना मान्यवरांच्या हस्ते सहभागी प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. पत्रकार दीपक कैतके, संजय जोग, क्लारा लुईस यांनी चार दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेविषयी मनोगत व्यक्त केले.मंत्रालय विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे यांनी आभार मानले. सरचिटणीस दीपक भातुसे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यकारिणी सदस्य खंडूराज गायकवाड यांनी कार्यक्रमाचे समन्वयन केले.

# जिल्हाधिकारी डॉ.पाटील 'ऑन फिल्ड'; वडनेर-मलकापूर रोडवर अवैध बायोडिझेलवर छापा

## २९030 किलो अवैध बायोडिझेल जप्त

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, बुलडाणा :** जिल्हा प्रशासनाकडून शनिवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्ह्यात अवैध बायोडिझेल व्यवहारावर मोठी धडक कारवाई करण्यात आली.

जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वडनेर – मलकापूर रोडवर संशयितरित्या उभा असलेल्या टँकरवर छापा टाकण्यात आला. या कारवाईत १२ लाख ३३ हजार १९४ रुपये किमतीचे २३०९० किलो अवैध बायोडिझेल जप्त करण्यात आले असून संबंधित ट्रक ताब्यात घेऊन गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे. उपलब्ध माहितीनुसार, वडनेर–मलकापूर रोडवर उभा असलेला टँकर क्रमांक GJ03BW3034 संशयितरित्या आढळून आला होता. या टँकरचा चालक सहदेवने उडवाउडवीची उत्तरे दिल्यामुळे त्यावर संशय बळावल्याने टँकरवर छापा टाकण्यात आला. हे बेकायदेशीर बायोडिझेल हॉनेस्ट कॉर्पोरेशन, पणोली, अंकलेश्वर, जिल्हा भरूच (गुजरात) येथून बापा सीताराम ट्रेडिंग, वाघुड, ता.मलकापूर, जि.बुलढाणा येथे पाठविण्यात येत होते. गोपनीय माहितीच्या आधारावर जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांच्या पथकाने ही कारवाई केली.



या प्रकरणात संबंधितांविरूद्ध एफआयआर दाखल करण्याची कार्यवाही तहसीलदार राहुल तायडे, पुरवठा निरीक्षक धनश्री हरणे यांनी केली असून गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही सुरु आहे. अवैध बायोडिझेल विक्री, वाहतूक व साठा प्रकरणी पुढील तपास जिल्हा प्रशासन व पोलिस निरीक्षक गणेश गिरी करत आहेत. जिल्ह्यात बेकायदेशीर बायोडिझेल व्यवहार कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. यात गुंतलेल्या व्यक्तींवर कठोर कारवाई केली जाईल. तसेच अवैध बायोडिझेल आढळल्यास त्याबाबत नागरिकांनी प्रशासनाला माहिती द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी केले आहे.

# थोडक्यात

## ग्रुप ग्रामपंचायत कासा येथे बिरसा मुंडा यांची जयंती साजरी

**अक्षराज : निलेश कासट**



**दि.१५, कासा (पालघर) :** आदिवासी समाजाचे क्रांतिकारी नेते व धरती आबा म्हणून ओळखले जाणारे भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त ग्रुप ग्रामपंचायत कासा येथे शनिवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात कार्यक्रम पार पडला. सरपंच, सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी आणि ग्रामस्थांच्या उपस्थितीत जयंती कार्यक्रमाची औपचारिकता साजरी करण्यात आली. सर्वप्रथम ग्रामपंचायत कार्यालयात बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर बिरसा मुंडा चौक येथे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ एकत्र जमून जयंतीला सामूहिक आदरांजली अर्पण करण्यात आली.

या कार्यक्रमास सरपंच सुनीता कामडी, उपसरपंच हरेश मुकणे, ग्रामसेवक अधिकारी दिघे, पेशा अध्यक्ष संतोष कोरडा, बांधकाम समिती अध्यक्ष अजय तुंबडा, ग्रामपंचायत सदस्य व बांधकाम समिती सचिव सुदाम कदम, इतर ग्रामपंचायत सदस्य, कर्मचारी तसेच रिक्षा चालक-मालक संघटनेचे सदस्य आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमात अजय तुंबडा यांनी प्रस्ताविक करताना बिरसा मुंडा यांच्या कार्याचा आढावा घेतला. त्यांनी जल, जंगल, जमीन या तीन मूलभूत हक्कांसाठी दिलेल्या बिरसा मुंडा यांच्या थोर लढ्याची माहिती उपस्थितांना दिली. ब्रिटिशांच्या अत्याचारांना विरोध करत अखेरच्या श्वासापर्यंत लढत राहिलेल्या बिरसा मुंडा यांच्या पराक्रमाचे महत्व त्यांनी अधोरेखित केले. अजय तुंबडा म्हणाले की, बिरसा मुंडा यांचे योगदान ऐतिहासिक असून ते आजच्या पिढीने जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांचा संघर्ष, त्यांचे विचार आणि त्याग आजही आदिवासी समाजाला प्रेरणा देणारे आहेत. ग्रुप ग्रामपंचायत कासा येथे पार पडलेला हा जयंती कार्यक्रम सामाजिक ऐक्य, आदिवासी अभिमान आणि ऐतिहासिक वारसा जपण्याच्या दृढनिश्चयाने यशस्वीरीत्या संपन्न झाला.

## जिल्हा परिषद शाळा धामटणे येथे बिरसा मुंडा जयंती साजरी

**अक्षराज : निलेश कासट**



**दि.१५, डहाणू (पालघर) :** आदिवासी क्रांतिकारक भगवान धरती आबा बिरसा मुंडा यांची जयंती चा उत्सव पालघर च्या आदिवासी भागात मोठ्या उत्सहात संपन्न झाला. केंद्र सरकार ने बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती निमित्ताने ही जयंती जन जाती गौरव म्हूणन साजरी करताना दिनांक ०१ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर २०२५ पर्यंत विविध कार्यक्रमाचे आयोजन करून पंधरावाडा साजरा केला. डहाणू मधील प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा धामटणे येथे ही जनजाती गौरव पंधरावडा साजरा करत बिरसा मुंडा जयंती शनिवार, दिनांक १५ नोव्हेंबर २०२५ रोजी साजरी करण्यात आली. शाळेतील विद्यार्थ्यांनी पंधरवडा साजरा करताना आदिवासी चालीरीती, सण, उत्सव, वाद्य, पारंपरिक आदिवासी खाद्य संस्कृती यांचा क्षेत्र भेट अभ्यास केला यावेळी शिक्षकांचे मोलाचे सहकार्य लाभले. बिरसा मुंडा यांची जयंती साजरा करताना सुरवातीला बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सुरवातील शाळेचे मुख्यध्यापक धर्मेंद्र कामडी यांनी प्रास्तविक मांडत शासनाचा जन जाती गौरव साजरा करण्याचा उद्देश काय आहे, तसेच बिरसा मुंडा यांचे स्वतंत्र लढ्यातील योगदान याविषयी माहिती दिली, तर तवा ग्रामपंचायतीचे सरपंच लहू बालशी यांनी बिरसा मुंडा यांच्या कार्या विषयी माहिती देत, सद्यस्थीत आदिवासी समाजाने आदिवासी क्रांतिकारक यांचा देशाच्या स्वतंत्र्या चे महत्वाचे योगदान असून आताच्या पिढीने आदर्श घेऊन समाजाचा विकास केला पाहिजे असे मत व्यक्त केले, तर सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार निलेश कासट यांनी बिरसा मुंडा यांनी ब्रिटिश, सावकार यांच्या विरुद्ध लढ्यासाठी आदिवासी समुदायला एकत्र करत उलगुलान करत हमारे गाव में, हमारा राज चा नारा देत जल, जंगल,जमिन वाचवण्यासाठी लढा दिला याबाबत बिरसा मुंडा यांच्या कार्याला उजाळा दिला. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे शिक्षक करबट यांनी करत त्यांनी बिरसा मुंडा यांच्या इतिहास व कार्य याबाबत माहिती दिली. यावेळी शाळेतील शिक्षक अविनाश चव्हाण, चंदू केदार व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शंकरराव चव्हाण विद्यालयात बालदिन उत्साहात साजरा

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.१४, नागपूर :** भारताचे पहिले प्रधानमंत्री पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस संपूर्ण देशात १४ नोव्हेंबर ला 'बालकदिन' म्हणून साजरा केल्या जातो. याच निमित्ताने वीज केंद्राच्या प्रकाशनगर वसाहतीत असलेल्या शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात बालकदिन मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती माता आणि पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पण करून द्वीप प्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांमध्ये एक वेगळाच उत्साह संचारलेला दिसून आला. चिमुकल्या विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने 'चाचा नेहरूंची' वेशभूषा परिधान केली होती. विद्यार्थ्यांनी चाचा नेहरूंच्या जीवनावर आधारित प्रभावी भाषणे सादर केली, शिवाय एकापेक्षा एक सरस देशभक्तीपर गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या या उपक्रमांमुळे संपूर्ण कार्यक्रमात चैतन्य निर्माण झाले होते.मंचावर वरिष्ठ शिक्षक गणेश चिखले, नरेंद्र बिटोलिया, चंद्रकांत मोहड, दिलदार रामटेके, प्रमोद इंगळे, अनिल भास्कर, मनीषा नखाते आदी उपस्थित होते. याप्रसंगी वरिष्ठ शिक्षक गणेश चिखले यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणात 'चाचा नेहरू' यांचा मुलांवरील निस्सीम स्नेह आणि देशाच्या विकासातील त्यांचे अमूल्य योगदान स्पष्ट करून सांगितले. चिखले सर पुढे म्हणाले की, नेहरूंनी केवळ देशाला नेतृत्व दिले नाही तर देशाचे भविष्य असलेल्या बालकांवर प्रेम केले. याच प्रेमाची आठवण म्हणून आपण बालकदिन साजरा करतो. शिवाय त्यांनी विद्यार्थ्यांना भावी जीवनासाठी शुभेच्छा देत, बालकदिनाचे सामाजिक आणि शैक्षणिक महत्त्व प्रभावीपणे पटवून दिले. देशाच्या उज्वल भविष्यासाठी प्रत्येक बालकाने गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊन जबाबदार नागरिक बनणे किती महत्त्वाचे आहे, हे त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून अधोरेखित केले.'चाचा नेहरूंच्या' आठवणींना उजाळा देणारा आणि विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारा हा कार्यक्रम शाळेच्या सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने यशस्वीरित्या पार पडला. कार्यक्रमाचे संचालन सुरेखा चिखले तर नीरज मिश्रा यांनी आभार मानले.